दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित


● वर्ष १७ वे ● अंक ९९ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.९ जुलै २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# ९२ नगरपालिकांसह ४ नगरपंचायतींच्या निवडणुकांचे बिगूल वाजले

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महाराष्ट्रातील नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. १७ जिल्ह्यातील ९२ नगरपालिकांच्या निवडणुका जाहीर करण्यात आल्या आहेत. ओबीसी राजकीय आरक्षणाचा प्रश्न प्रलंबित असल्यानं राज्यातील जन–तेचं निवडणुका कधी जाहीर होणार याकडे लक्ष लागलं होतं. अखेर निवडणूक आयोगानं ९२ नगरपालिकांची निवडणूक जाहीर केली आहे. आता १८ ऑगस्ट रोजी मतदानाची प्रक्रिया पार पडेल आणि त्यानंतर १९ ऑगस्ट रोजी निकाल जाहीर करण्यात येईल. १७ जिल्ह्यातील कमी पाऊस पडणाऱ्या नगरपालिका क्षेत्रांमध्ये निवडणूक पार पडणार आहे.

जिल्हाधिकारी कार्यक्रम जाहीर करणार : २० जुलै, उमेदवारी अर्ज उपलब्ध : २२ ते २८ जुलै, अर्ज स्वीकारण्याचा कालावधी २२ ते २८ जुलै, अर्जाची छाननी : २९ जुलै, अर्ज मागे घेण्याची मुदत : ४ ऑगस्ट दुपारी ३ पर्यंत, उमदेवारी अर्जावरील आक्षेप : ८ ऑगस्ट, मतदानाचा दिनांक : १८ ऑगस्ट, मतमोजणी आणि निकाल : १९ ऑगस्ट रोजी ला–गणार आहे.



अ वर्ग नगरपालिका **:** पुणे : बारामती, सोलापूर : बार्शी, जालना : जालना, बीड : बीड, उस्मानाबाद : उस्मानाबाद, जळगाव : भुसावळ

ब वर्ग नगरपालिका **:** नाशिक : मनमाड, सिन्नर, येवला, धुळे :दोंडाईचा बरवाडे, शिरपूर वरवाडे, नंदूरबार : शहादा, जळगाव : अमळनेर, चाळीसगाव, अहमदनगर : संगमनेर, कोपरगाव, श्रीरामपूर, पुणे : चाकण, दौंड, सातारा : कराड, फलटण, सागंली : इस्लामपूर, विटा, सोलापूर : अक्कलकोट, पंढरपूर, अकलूज, कोल्हापूर : जयसिंगपूर, औरंगाबाद : कन्नड पैठण, बीड : अंबेजोगाई, माजलगाव, परळी–वैजनाथ, लातूर : अहमदपूर, अमरावती : अंजनगाव सूर्जी,


क वर्ग नगरपालिका **:** नाशिक : चांदवड, नांदगाव, सटाणा, भगूर, जळगाव : वरणगांव, धरणगाव, एंरणडोल, फैजपूर, पारोळा, यावस, अहमदनगर : जामखेड, शेवगाव, देवळाली प्रवरा, पाथर्डी, राहता, राहुरी, पुणे : राजगुरुनगर, आळंदी, इंदापूर,जेजुरी, सासवड, शिरुर, सातारा : म्हसवड, रहितमपूर, वाई, सांगली : आष्टा, तासगाव, पलूस, सोलापूर : मोहोळ, दुधनी, करमाळा, कुर्डूवाडी, मंदगी, मंगळवेढा, सांगोला, कोल्हापूर : गडहिंग्लज, कागल, कुरुंदवाड, मुरगूड, वडगाव, औरंगाबाद : गंगापूर, खुल्ताबाद, जालना: अंबड, भोकरदन, परतूर, बीड : गेवराई, किल्ले धारुर, उस्मानाबाद : भूम, कळंब, मुरुम, नळदूर्ग, उमरगा, परंडा, तुळजापूर, लातूर : औसा, निलंगा, अमरावती : दर्यापूर, बुलडाणा : देऊळगाव राजा

नगरपंचायत निवडणूक **:** अहमदनगर : नेवासा, पुणे : मंचर, माळेगाव बुद्रुक, सोलापूर : अनगर या नगरपालिका व नगरपंचायतीच्या निवडणुका होणार आहेत.

# महावितरणने मोठा शॉक दिला ; वीज दरात वाढ

## ८० ते २०० रुपयांनी बिल वाढणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**



राज्यातील जनता वाढत्या महागाईने होरपळून निघत असतानाच आता महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने वीज कंपन्यांना वीज बिलातून इंधन समायोजन आकार वसूल करण्याबाबत मंजुरी दिल्याने वीज ग्राहकांना वीज दरवाढीचे आणखी चटके बसणार आहेत. जून महिन्यापासून पुढील पाच महिने म्हणजे ऑक्टोबर महिन्यापर्यंत इंधन समायोजन आकार वीज ग्राहकांच्या वीज बिलात लागू होणार असून, ही वाढ प्रतियुनिट सरासरी एक रुपया असणार आहे.

जानेवारी, फेब्रूवारी, मार्च, एप्रिल या चार महिन्यांत वीज खरेदीवर झालेला खर्च भरून काढण्यासाठी वीज कंपन्यांच्या वीज बिलात ग्राहकांसाठी इंधन समायोजन आकार लागू केला जाणार आहेत. इंधन समायोजन आकारात वाढ झाल्याने अदानी इलेक्ट्रिसिटीच्या वीज ग्राहकांना प्रति युनिट सरासरी ९२ पैसे एवढी वाढ मोजावी लागेल. तर टाटा पॉवरच्या वीज ग्राहकांना प्रति युनिट सरासरी १ रुपये ५ पैसे एवढी वाढ मोजावी लागणार आहे. दरम्यान, वीज ग्राहकांचा वीज युनिट वापरचा स्लॅब बदलल्यानंतर वीज बिलात वापरानुसार वाढ होणार आहे.

# देवशयनी आषाढी एकादशी दिंडी



**दै.रायगड नगरी । पनवेल**

रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील आणि सौ. भारती पाटील यांनी कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलला सदिच्छा भेट दिली. देवशयनी आषाढी एकादशी निमित्त विद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या दिंडीत त्यांनी तसेच लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सहभाग घेतला.

यावेळी रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी डॉ. अनिल पाटील आणि सौ. भारती पाटील यांचे स्वागत केले. यावेळी संस्थेचे ऑडिटर शिवलिंग मेनकुदळे, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, बाळासाहेब कारंडे, मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे व अर्चना खाडे आदी उपस्थित होते.

# पेणमध्ये बंटी बबलीचा धुमाकूळ


## प्रवीणा सावंत व साथीदाराला पेण पोलिसांकडून अटक

**दै.रायगड नगरी । पेण**

जेएसडब्ल्यू कंपनीत नोकरी लावते तसेच या कंपनीत ठेका मिळवून देण्याचा बहाणा करुन ३१ लाख ७९ हजारांची फसवणूक केल्या प्रकरणी पेण येथील राजकीय पक्षाची महिला नेता प्रविणा सावंत व तिचा पेणचाच साथीदार अतुल मांडवकर याला पेण पोलिसांनी अटक केली आहे.

या बाबत सविस्तर वृत्त असे कि, फिर्यादी अजय पाटील रा.लाईन आळी, पनवेल यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, डोलवी येथील जेएसडब्ल्यू कंपनीत स्क्रॅपचे कंत्राट मिळवून देते असे सांगून पेण येथील आरोपी प्रविणा सावंत ( रा.गुरुकृपा सोसायटी,पेण) तसेच तिचा पेण येथील साथीदार अतुल मांडवकर यांनी पहिले दोन लाख रुपये उकळले व विश्वास संपादन केला. तसेच त्यानंतर जेएससडब्ल्यू कंपनीत एच.आर. विभागातील अधिकारी अर्जुन कामत हे माझ्या खास परिचयाचे असल्याचे सांगून सदर कंपनीत सिक्युरिटी पदासाठी ३० ते ५० हजार, क्लेअरीकल पदासाठी ६० हजार व त्यावरील पदासाठी १ लाख ते १ लाख २० हजार रुपये घेऊन फक्त १० ते २० दिवसात नोकरीला लावते असे सांगून आर्थिक फसवणूक केली आहे. या बंटी व बबलीने आत्तापर्यंत धुमाकूळ घालत तक्रार दिलेल्या ४३ तरुणांकडून २० जानेवारी २०२२ ते ८ मे २०२२ या कालावधीत ३१ लाख ७९ हजार रुपये घेऊन फसवणूक केली. प्रत्येकी ३० हजार ते एक लाख २० हजार असे एकूण २९ लाख ७९ हजार रुपये तसेच फिर्यादी यांना जेएसडब्ल्यू कंपनीत स्क्रॅपचा ठेका मिळवून देण्यासाठी दोन लाख रुपये असे एकूण ३१ लाख ७९ हजार रुपये घेऊन फिर्यादी यांना कोणतेही कंत्राट व नोकरी दिली नाही. .../२

# महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झालेल्या सदस्यांना शपथ



**दै.रायगड नगरी । मुंबई**

महाराष्ट्र विधानपरिषदेवर विधानसभा सदस्यांद्वारे निर्वाचित झालेल्या दहा सदस्यांचा शपथविधी, प्रतिज्ञाग्रहण कार्यक्रम विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज झाला.

नवनिर्वाचित सदस्य रामराजे नाईक–निंबाळकर, एकनाथ खडसे, प्रवीण दरेकर, प्रा. राम शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, प्रसाद लाड, उमा खापरे, आमश्या पाडवी, श्रीकांत भारतीय, सचिन अहिर यांनी आज विधानपरिषद सदस्यत्वाची शपथ घेतली. विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी नवनिर्वाचित सदस्यांना शपथ दिली. यावेळी विधानमंडळाचे प्रधान सचिव राजेंद्र भागवत, उपसचिव राजेश तारवी उपस्थित होते.

## संक्षिप्त...


### संजय राऊतांना मोठा दणका ; अटक वॉरंट जारी



**दै.रायगड नगरी । मुंबई**

शिवसेना नेते संजय राऊत यांना खूप मोठा दणका शिवडी कोर्टाने दिला आहे. संजय राऊत यांच्या विरोधात शिवडी कोर्टाने जामीनपात्र अटक वॉरंट जारी केलं आहे. भाजप नेते किरीट सोमय्या यांच्या पत्नी मेधा सोमय्या यांनी केलेल्या तक्रारीप्रकरणी कोर्टाकडून वॉरंट जारी करण्यात आलं आहे. मेधा किरीट सोमय्या यांनी दाखल केलेल्या तक्रारीवरून मुंबई महानगर दंडाधिकारीनी संजय राऊत यांच्याविरुद्ध भादंवि कलम ४९९, ५०० साठी वॉरंट जारी केले. महाराष्ट्रात शिवसेना खासदार संजय राऊत यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. भाजप नेते किरीट सोमय्या यांच्या पत्नी मेधा सोमय्या यांनी संजय राऊत यांच्याविरोधात न्यायालयात मानहानीची तक्रार दाखल केली होती. संजय राऊत यांनी १०० कोटींच्या शौचालय घोटाळ्यात गुंतल्याचा आरोप केला आहे. शिवडी मेट्रोपॉलिटन मॅजिस्ट्रेट कोर्टात दाखल केलेल्या तक्रारीत मेधा यांनी संजय राऊत यांनी गेल्या महिन्यात केलेले आरोप निराधार आणि बदनामीकारक असल्याचे म्हटले होते.

# जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या शिक्षण संकुलांमध्ये आदरणीय तीर्थरूप महाराष्ट्रभूषण डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी यांना आदरांजली



**दै.रायगड नगरी । पनवेल**

आदरणीय तीर्थरूप महाराष्ट्रभूषण डॉ. श्री.नानासाहेब धर्माधिकारी यांनी लाखो लोकांना जगण्याची चांगली शिकवण दिली. आपल्या श्री बैठकीच्या माध्यमातून अनेकांचे उध्वस्त संसार त्यांनी पुन्हा बसवले. समाजाला जगण्याची चांगली दिशा दाखवली. आपल्या निसर्गाच्या आवडीतून त्यांनी लाखो झाडे लावून ती वाढवण्याची आणि लोकांमध्ये निसर्गाबद्दल जनजागृती करण्याची त्यांनी शिकवण दिली.

आज त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना आदरांजली म्हणून श्री.प्रितम जनार्दन म्हात्रे अध्यक्ष असलेल्या जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या शिक्षण संकुलामध्ये आदरणीय तीर्थरूप महाराष्ट्रभूषण डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी वृक्ष संवर्धन योजना सुरू करण्यात आली. या योजनेमध्ये लहान मुलांना निसर्गाबद्दल ओढ निर्माण व्हावी या नानासाहेबांच्या शिकवणीतून त्या मुलांच्या वाढदिवशी जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भेट म्हणून एक छोटे रोपटे देण्यात येणार आहे. हे रोपटे त्या विद्यार्थ्यांनी घराजवळ परिसरात लावायचे आणि त्याचे संगोपन करायचे.

वार्षिक परीक्षेच्या वेळी सदर झाडाचा फोटो शाळेमध्ये देऊन छोटे रोपटे लागवड करून त्याच संगोपन केल्याबद्दल त्या विद्यार्थ्यांना शाळेकडून काही गुण देण्यात येतील जेणेकरून त्या मिळणाऱ्या गुणासाठी वर्षभर त्या छोट्याशा रोपट्याचे संगोपन केले जाईल आणि त्या लहान मुलांमध्ये निसर्गाबद्दल जवळीक निर्माण होईल हीच आदरणीय तीर्थरूप महाराष्ट्रभूषण डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी यांना आपल्या सर्वांतर्फे आदरांजली असेल.

आमच्या सर्व शाळांचे मिळून दोन ते अडीच हजार विद्यार्थी आहेत दरवर्षी एवढी झाडे लावून त्यासोबतच त्यांचे संवर्धन सुद्धा होईल हीच आमच्या जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून आदरणीय तीर्थरूप महाराष्ट्रभूषण डॉ. श्री.नानासाहेब धर्माधिकारी यांना आदरांजली असेल. मी महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाला सुद्धा विनंती करणार आहे त्यांनी सुद्धा शैक्षणिक धोरणामध्ये अशा प्रकारचे वृक्ष संवर्धनासाठी काही ठराविक गुण विद्यार्थ्यांना राखून ठेवावे जेणेकरून दरवर्षी लाखो वृक्ष लागवड होऊन त्यांचे संवर्धन केले जाईल.

**प्रितम ज. म्हात्रे, अध्यक्ष,**
**जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्था**

# महापालिकेच्या पहिल्या पंचवार्षिक सदस्यांचा निरोप समारंभ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेत निवडून आलेल्या ७३ सदस्यांची पहिल्या पंचवार्षिकमधील शेवटची महासभा आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात घेण्यात आली. यावेळी सर्व. सदस्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. सर्वसाधारण सभेनंतर नगरसेवकांच्या निरोप समारंभाचा कार्यक्रम झाला. यावेळी अनेक सदस्य पाच वर्षांतील अनुभव सांगताना भावुक झालेले दिसले

पनवेल महानगरपालिकेची स्थापना १ ओक्टोंबर २०१६ रोजी झाली. महानगरपालिकेची पहिली महासभा १० जुलैला झाली होती. आज महापालिकेची ५० वी महासभा घेण्यात आली. आज महासभेत १६ विषय मंजूर करण्यात आले. सभेचे कामकाज संपल्यावर सर्वांचा एकत्र फोटो काढण्यात आला. भोजना नंतर,पुन्हा सभागृहात आलेल्या सदस्यांनी पाच वर्षांत आलेले अनुभवांचे कथन निरोपाच्या कार्यक्रमात केले. आयुक्त गणेश देशमुख यांचे काम करताना मिळालेले सहकार्य बहुमोल असल्याचे सर्वच सदस्यांनी सांगितले. उपमहापौर सीतामाई पाटील आणि स्थायी समिती सभापती नरेश पाटील यांनी देखील सर्वांचे आभार मानले.

महापौर डॉक्टर कविता चौतमोल यांनी ' सब का साथ, सबका विकास' हेच मी सुरूवातीला सांगितले होते. त्याचा प्रत्यय मला सभागृहात आल्याचे सांगितले . पाच वर्षात विकासाची अनेक कामे केली. झोपडपट्ट्यांचा विकास, महिलांच्या आरोग्यासाठी शिबीर, शहरा–तील सुशोभीकरण, क्रिकेट प्रशिक्षण केंद्र यासारखी कामे मार्गी लागली असे सांगून सभागृह नेते परेश ठाकूर, विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे व तुम्ही सर्व सदस्यांनी दिलेल्या सहकार्यामुळेच हे शक्य झाले. महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख, त्यांचे सहकारी व कर्मचारी यांनी त्यासाठी घेतलेली मेहनत यामुळे विकास कामे करणे शक्य झाले. लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांतदादा ठाकूर यांनी दोनदा संधि दिली त्याबद्दल त्यांना धन्यवाद देऊन आणि सर्व सदस्यांचे आभार मानले.

सभागृह नेते परेश ठाकूर .../२



# जुन्या मुंबई पुणे महामार्गावर खड्ड्यात आदळून रिक्षा चाक तुटले

**दै.रायगड नगरी । खोपोली**

पावसाळा सुरवात होताच जुन्या मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक.०४ खड्ड्याचे साम्राज्य पसरले आहे. खालापूर हुन खोपोली कडे भर पाऊसात रिक्षा जात असताना रस्त्यावर जागो जागी फूट फूट खोळीचे झालेल्या खड्ड्यान मुळे तसेच खड्ड्यांमध्ये पाणी साठल्याने रिक्षा चालकाला रस्त्यावरील पडलेल्या खड्ड्यांचा अंदाज न .../२



# आर्थिक कसरत

डॉलरच्या तुलनेत घसरत असलेला रुपया सावरण्यासाठी रिझर्व्ह बँकेने बुधवारी काही उपाययोजना जाहीर केल्या. त्यामध्ये स्वाभाविकच डॉलरचा ओघ वाढविण्यावर भर आहे. गेल्या काही दिवसांपासून डॉलरच्या तुलनेत रुपया दररोज नीचांकी पातळी गाठत असून, चालू आर्थिक वर्षात रुपयात ४.१ टक्क्याने घसरण झाली आहे. ही घसरण थांबण्यासाठी केंद्र सरकार कोणती पावले उचलणार याकडे साऱ्यांचे लक्ष होते. रशिया–युक्रेन युद्ध, तेलाच्या किमती आदी आंतरराष्ट्रीय कारणे रुपयाच्या घसरणीमागे असली, तरी देशांतर्गत कारणेही तितकीच महत्त्वाची. परकी गुंतवणूकदार गुंतवणूक काढून घेत असल्याने आणि चालू खात्यातील तूट वाढत असल्याने डॉलरचा ओघ आटला आहे. परिणामी परकी चलनाची गंगाजळी खालावत आहे. सध्या या गंगाजळीत ५९३.३ अब्ज डॉलर असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत त्यात ५० अब्ज डॉलरची घट आहे. या खेरीज सहाशे अब्ज डॉलर कर्जाच्या एक तृतीयांश रक्कम फेडण्याचा काळ लवकरच सुरू होईल. त्यामुळे डॉलरची आवक वाढणे गरजेचे आहे. चालू खात्यातील तूट चिंताजनक आहे. गेल्या आर्थिक वर्षाच्या चौथ्या तिमाहीत ही तूट १३.४ अब्ज डॉलर होती. एकूण देशांतर्गत उत्पन्नाच्या (जीडीपी) तुलनेत हे प्रमाण दीड टक्का आहे. त्या आधीच्या तिमाहीत हे प्रमाण २.६ टक्के होते. ते कमी करण्यात यश आले खरे; परंतु त्यात समाधान मानण्यासारखी स्थिती नाही. त्याच्या आधीच्या आर्थिक वर्षात ही तूट एक टक्का होती. त्यामुळे ही तूट कमी करावी लागेल; त्यासाठी आयात आणि निर्यात यांमधील समतोल साधणे आणि व्यापारातील तूट भरून काढणे महत्त्वाचे ठरते. या पार्श्वभूमीवर रिझर्व्ह बँकेने केलेल्या उपायांकडे पहावे लागेल. परकी गुंतवणुकीवरील निर्बंध हटविण्यावर मध्यवर्ती बँकेचा भर दिसतो. विशेषत: व्याजदराचे निर्बंध शिथिल केले आहेत. या उपायानंतर लगेच दुसऱ्या दिवशी रुपया किंचित सावरला हे खरे; परंतु त्याला केवळ हे उपायच कारणीभूत नाहीत. कच्च्या तेलाच्या किमतीत झालेल्या घसरणीचाही हा परिणाम म्हणावा लागेल. रुपयाची घसरण थांबविण्यासाठी मध्यवर्ती बँकेने पाऊल उचलणे आवश्यक होते; ते तसे उचलले गेले हे स्वागतार्हच; परंतु यामुळे रुपयाची घसरण लगेच थांबेल असे नाही. मात्र, घसरणीचा वेग कमी होऊ शकतो. या वर्षाच्या अखेर एक डॉलर ८१ रुपयांपर्यंत जाऊ शकेल, असा अंदाज काही संस्था व्यक्त करीत आहेत. तो खरा ठरो किंवा न ठरो; परंतु रिझर्व्ह बँकेला आणि सरकारला परिस्थिती नियंत्रणाखाली ठेवण्यासाठी उपाय आखावे लागतील. त्या दिशेने प्रयत्न होणे म्हणूनच महत्त्वाचे ठरते. सोन्यावरील आयात शुल्कात सरकारने एक जुलैपासून वाढ केली आहे; ती आता ७.५ टक्क्यांवरून १२.५ टक्क्यांवर गेली आहे. त्यामुळेही रुपया सावरेल असा कयास बांधण्यात आला होता. अशा विविध उपायांद्वारे रुपया सावरत असताना महागाईलाही अटकाव घालण्याचे आव्हान सरकारसमोर आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलात होत असलेली घट ही यासाठी चांगली बातमी म्हणावी लागेल. असे असले, तरी स्वयंपाकासाठी लागणाऱ्या एलपीजी गॅस सिलिंडरच्या दरात ५० रुपयांनी झालेली वाढ सर्वसामान्यांसाठी महागाईचा भडका उडविणारी आहे. गेल्या दोन महिन्यांत एलपीजीच्या दरात तिसऱ्यांदा वाढ झाली. सिलिंडर आता २४४ रुपयांनी महागला आहे. सिलिंडरवरील अनुदान सरकारने यापूर्वीच अघोषितपणे बंद केले आहे; त्यामुळे याचा फटका सर्वसामान्यांना अधिक प्रमाणावर बसतो आहे. एक हजार रुपयांहून अधिक रक्कम सिलिंडरसाठी मोजावी लागणे अनेकांना परवडणारे नाही. त्यामुळे सरसकट सर्वांचे अनुदान बंद करण्याच्या धोरणाचा फेरविचार होणे आवश्यक आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या दरांमध्ये मोठी वाढ होऊ लागल्यावर येत असलेल्या प्रतिकूल प्रतिक्रिया आणि लोकांमधील रोष लक्षात घेऊन केंद्राने करांमध्ये कपात करण्याचा निर्णय घेतला. स्वयंपाकाच्या गॅसच्या दराबाबतही असा निर्णय व्हावा. इंधनाची दरवाढ नेहमीच महागाईत तेल ओतणारी असते. स्वयंपाकाचा गॅस महागणे थेट लोकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित असलेली बाब. इंधनाच्या दराबाबत आर्थिक स्थितीचा विचार महत्त्वाचा असतोच; परंतु आपल्याकडे तो सोयीने केला जातो. निवडणुका असल्या, त्याचा राजकीय अंगाने अधिक विचार केला जातो. त्यामुळे कोणत्या ना कोणत्या राज्यात विधानसभांच्या निवडणुका असल्या, की इंधनाच्या दरातील दैनंदिन चढ–उतार थांबतात. निवडणुका संपल्या, की त्या पुन्हा पूर्ववत सुरू होतात. महागाईचा विचार असा केवळ निवडणुकांपुरता होऊ नये. सर्वसामान्यांना जगणे सुसह्य होण्यासाठी महागाई नियंत्रणात ठेवणे आणि त्यांना अधिक चांगली स्थिती उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्यासाठी राजकारण आणि अर्थकारण यांमधील समतोल साधण्याची कसरत करणे महत्त्वाचे ठरते.

# एका १२ वर्षीय मुलीला मारहाण केल्याप्रकरणी शिक्षिकेवर कारवाई करण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

हरिग्राम येथील अशोक माळी यांची १२ वर्षा ची मुलगी कु. एंजल अशोक माळी हिला काल शाळेतील शिक्षिकेने बेदम मारहाण केली यात तिच्या कानाला मार लागला. त्यामुळे ती भीतीने रात्रभर न झोपता रडत असल्याचे पालकांकडून सांगण्यत आले.

कु एंजल माळी ही केवाळे येथील रामकृष्ण अकॅडमी या शाळेत आठवीत शिकत आहे. कविता पाठ नसल्यावरून तिच्या शिक्षिका सौ उज्ज्वला जाधव यांनी तिला बेदम मारहाण केली असता तिच्या कानाला जबर मार लागला असल्याचे पनवेल तालुका पोलीस स्टेशन तसेच गट शिक्षण अधिकारी यांना लेखी तक्रार केली असून सदर शिक्षिकेवर लवकरात लवकर कारवाई ची मागणी मुलीचे वडील अशोक माळी यांनी केली आहे.

कोविड सारख्या महामारी च्या दोन वर्षानंतर शाळा सुरु झाल्या त्याचा ताण विद्यार्थ्यां वर जाणवत असताना असे प्रसंग घडत आहेत.

याप्रकरणी माळी यांनी शाळेच्या मुख्याध्यपिका यांच्या कडे तक्रार केली असता बघतो, करतो अशी उडवा उडवीची उत्तरे दिली असल्याचे कळते. यापूर्वी ही अश्या प्रकारच्या घटना या शाळेत घडल्या असून कोणावरही अद्याप कारवाई करण्यात आलेली नसल्याचे म्हंटले आहे. कु. एंजल माळी चा चुलत भाऊ कु.यतिश दत्ता माळी याच्यावरही सौ उज्ज्वला जाधव याच शिक्षिके कडून मारहाण करण्यात आली होती त्यावेळी त्याला चार दिवस हॉस्पिटल मध्ये दाखल करण्यात आले होते. त्यावेळी ही या शिक्षिकेवर कोणतीही कारवाई करण्यात आली नव्हती. या प्रकरणी सदर शिक्षिकेवर संबंधित प्रशासन,अधिकारी यांनी त्वरित कारवाई करावी व कु एंजल माळी हिला न्याय द्यावा. अशी मागणी महाराष्ट्र पोलीस मित्र व नागरिक समन्वय समितीचे कोकण अध्यक्ष प्रसाद हनुमंते यांनी केली आहे.

# अखेर पाली स्मशान भूमीवर पत्रे बसविले

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

पाली बस स्थानकाजवळील अंबा नदी किनारी असलेल्या प्रमुख स्मशानभूमीची प्रचंड दुरवस्था झाली आहे. शिवाय स्मशानभूमीचे पत्रे फुटल्याने येथे भर पावसात मृतदेहावर अंत्यसंस्कार करावे लागत होते. ३ दिवसांपूर्वी माध्यमांनी ही बाब निदर्शनास आणली होती. त्या अनुषंगाने दखल घेत पाली नगरपंचायत व बांधकाम सभापती प्रणाली शेळके, पाणी पुरवठा सभापती सुलतान बेनसेकर उपनगराध्यक्ष आरिफ मणियार आदींच्या पुढाकाराने स्मशानभूमीवर पत्रे बसविण्यात आले आहेत.

पत्रे बसविण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते सूरज शेळके व अमर वरंडे यांचेही सहकार्य लाभले. सोमवारी (ता.४) येथे एक मृतदेह जाळण्यासाठी तब्बल साडेसहा तास लागले होते. तसेच ४५ लिटर रॉकेल व ४० टायरचा वापर करावा लागला. या असुविधेमुळे नागरिकांनी प्रचंड संताप व्यक्त केला होता.

स्मशानभूमीवर पत्रे बसविले असले तरी देखील अजुनही स्मशानभूमीला अनेक समस्यांनी घेरले आहे. या स्मशानभूमीत विजेची व्यवस्था नाही. लाद्यांचे व सिमेंटचे बाकडे तुटले आहेत. तर काही समाजकंटकांनी ते तोडले आहेत. त्यामुळे अंत्यसंस्कारासाठी आलेल्या लोकांना बसण्यासाठी जागा नाही. फारश्या तुटलेल्या आहेत. स्मशानभूमीच्या एका बाजूची जमीन खचली आहे. त्यामुळे स्मशानभूमी नदीत ढासळण्याचा धोका आहे. यामुळे अपघात देखील घडू शकतो. स्वच्छता व इतर कामांसाठी कायमस्वरूपी माणसाची नेमणूक नाही.

त्यामुळे नेहमी अस्वच्छता असते. ही स्मशानभूमी दारुड्यांचा अड्डा झाला आहे. शिवाय पालीतील एकमेव लाकडांची वखार बंद झाल्याने मृतदेह जाळण्यासाठी नागोठणे येथे जावे लागते. यासाठी अधिकचा वेळ व पैसा जातो. एकूणच स्मशानभूमीची प्रचंड दुरवस्था झाली आहे. या सगळ्याचा याचा हकनाक त्रास मृतांचे नातेवाईक व लोकांना होत आहे.

# पनवेल शहर पोलिसांच्या शिष्टाईमुळे केली व्यापारास मिळाला न्याय

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहर पोलीस ठाण्याचे उप निरीक्षक सुनील गिरी यांच्यामुळे शिष्टाईमुळे एका केळी व्यापाऱ्याला न्याय मिळाला आहे. त्यामुळे व्यापाऱ्याने पोलिसांचे आभार मानले आहेत.

सोलापूर जिल्ह्यातील करमाळा येथील केळ्याचे व्यापारी अक्षय पोटे यांनी आपला माल पनवेल मधील एका व्यापाऱ्याला विकला होता. मात्र तो त्यांचे पैसे देण्यास टाळाटाळ करत होता याबाबत अक्षय पोटे यांनी पनवेल शहर पोलित ठाण्यात अर्ज दिला होता. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करत पोलीस उप निरीक्षक सुनील गिरी यांनी पनवेलच्या व्यापाऱ्याला बोलावून घेऊन सदर केळी व्यापाऱ्याचे पैसे मिळवून दिले. त्याबद्दल व्यापारी अक्षय पोटे यांनी पो–लीस उप निरीक्षक सूनिल गिरी यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

# गुरुपौर्णिमेनिमित्त चिरनेर ते वहाळ श्री साईबाबांची पायी पालखी दिंडी सोहळा

**दै.रायगड नगरी । उरण**

बुधवार १३ जुलै २०२२ रोजी हिंदू धर्मातील प्रसिद्ध सणापैकी एक असलेले गुरुपौर्णिमा हा सण आहे. या गुरुपौर्णिमा सणाचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे याहि वर्षी साई सेवा मंडळ चिरनेर तर्फे श्री महागणपती मंदिर चिरनेर (उरण )ते श्री साई मंदिर वहाळ (पनवेल) दरम्यान श्री साईबाबाची पायी पालखी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

सालाबादप्रमाणे याही वर्षी श्री महा–गणपती मंदिर चिरनेर येथून वारकरी दिंडी पदयात्रा बुधवार दि १३/७/२०२२ रोजी दुपारी १२ वा. श्रीची आरती करून साई मंदिर वहाळ येथे प्रस्थान होणार आहे. यंदाचे हे पदयात्रेचे ७ वे वर्ष आहे. सदर पदयात्रा यशस्वी करण्यासाठी गजानन फुंडेकर (कार्याध्यक्ष), नितीन नारंगीकर (उपाध्यक्ष), अमित मुंबईकर (अध्यक्ष), संतोष चिर्लेकर (सचिव), प्रसाद पाटील (खजिनदार), बबन ठाकूर (सल्लागार), गजानन म्हात्रे (सल्लागार), हरिश्चंद्र मोकल (सल्लागार), रमेश म्हात्रे (सल्लागार) यांच्यासह साई सेवा मंडळ चिरनेरचे सर्व पदाधिकारी सदस्य विशेष मेहनत घेत आहेत.

तरी सर्व साईभक्तांनी दिंडी मध्ये सहभागी होउन श्री साईचा कृपाशिर्वाद घ्यावा असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी, दिंडी मध्ये सहभागी होण्यासाठी अध्यक्ष अमित मुंबईकर फोन नंबर ८४५२९३७३८२, उपाध्यक्ष नितिन नारंगीकर ८४५४९३७९६६ यांच्याशी संपर्क साधावे.

# अपघातग्रस्त तरुणाला जीवनदान ; रणजित नरुटे नावाच्या तरुणाचा सतर्कपणा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सायन पनवेल महामार्गावर मध्यरात्रीच्या सुमारास भर पावसाचा अपघाताने धारातीर्थ पडलेल्या अपघातग्रस्ताला रणजित नरुटे या युवकाने जीवनदान दिले आहे. कोपरा खाडी पुलाजवळ हा जखमी तरुण रस्त्यावर पडला असल्याचे निदर्शनास आले. तरुणाला दुखापत झाल्याने रणजित व त्याचा मित्र हर्षद बडे यांनी ऍम्ब्युलन्स बोलावून घेतली. १० मिनिटात एम्बुलन्स घटनास्थळी दाखल झाल्यावर जखमी तरुणाला त्वरित एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले.

रणजित हा आपला मित्र हर्षद बडे याच्यासोबत मुंबईला कामानिमित्त गेला होता. मुंबई वरून घरी परतत असताना रात्री जवळ जवळ १.३० वाजले होते. खारघर टोल नाका ओलांडल्यानंतर कोपरा खाडी पुलावर अपघात झालेला एक तरुण बेशुद्ध अवस्थेत पडला होता तसेच पाऊस खूप पडत होता. अप–घात पाहून सुद्धा कोणी थांबत नसल्याचे रणजित च्या निदर्शनास आले. घटनास्थळी मोटार सायकल एका बाजूला व हेल्मेट एका बाजूला पडले असल्याचे रणजित ने पाहिले. संबंधित अपघातग्रस्त तरुण बोलायच्या मानसिकतेत देखील नव्हता. या तरुणाला मदत मिळाल्याने त्याचे प्राण वाचले. जखमी तरुण हा एमजीएम कामोठे येथे उपचार घेत आहे. रणजित नरुटे हा राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचा जिल्हा उपाध्यक्ष आहे.

राजकारणात कार्यरत असताना लोकप्रतिनिधी कसा असावा याचे आपल्या कृत्यातून नरुटे याने दाखवून दिले आहे. यावेळी नरुटे यांनी नागरिकांना देखील विनंती केली आहे कि ; पावसाळ्याचे दिवस असल्याने वाहने सावकाश चालवावी. तसेच अपघातग्रस्तांना तातडीने वैद्यकीय मदत पोहचविल्यास अनेकांचे जीव देखील वाचु शकतात. कोपरा खाडीपुलावर रस्त्याच्या मधोमध भेगा पडलेल्या आहेत. पावसाळ्यापूर्वी सार्वजनिक बांधकाम खात्याने हे काम हाती घेतले आहे. मात्र त्यांना ते काम पूर्ण करता आलेले नाही. या पुल–ावर पडलेल्या मोठ्या गॅप मध्ये विशेषतः दुचाकीचे चाक अडकून अपघात होत आहेत. संबंधित प्रकाराची दखल न घेतल्यास भविष्यात मोठ्या अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## पेणमध्ये बंटी बबलीचा धुमाकूळ

पोलीस तपासात धक्कादायक माहिती समोर येत, सदर आरोपी प्रवीणा सावंत ही तिचा साथीदार अतुल मांडवकर यास जेएसडब्ल्यू कंपनीचा एच.आर.विभागातील अधिकारी म्हणून सांगत असत. आणि ज्या तरुणांना कंपनीच्या अधिकाऱ्याला भेटायचं असेल त्यावेळी आरोपी अतुल यास कंपनीच्या गेटवर उभा करून फसवत असेल. मात्र अनेक महिने नोकरी व ठेका मिळत नसल्याने सदर फिर्यादीने पेण पोलीस स्टेशन गाठत तक्रार दाखल केली.

त्यामुळे पेण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली सदर तरुणांना नोकरी व ठेका न देता आर्थिक फसवणुक केल्या प्रकरणी पेण पोलीस ठाणे येथे गु.र.नं. १५४ /२०२२ भा.दं.वि.क. ४२०, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सपोनि पी.टी.काळे हे अधिक तपास करीत आहेत.

## महापालिकेच्या पहिल्या पंचवार्षिक सदस्यांचा निरोप समारंभ

यांनी आयुक्त गणेश देशमुख यांचे मनापासून आभार मानून ,त्यांच्यामुळे पनवेल शहराचा प्रवास उत्तम सुरु आहे. शहरी भागा बरोबरच नव्याने महापालिकेत सामील झालेल्या ग्रामीण भागाच्या विकासासाठी ही आम्ही प्रयत्न केले. पनवेल शहराला जागतिक किर्तीचे शहर बनविण्यासाठी यापुढे ही प्रयत्न केला जाणार असल्याचे सांगितले. आपल्याला निवडून दिलेल्या ,आपल्यावर विश्वास ठेवलेल्या पनवेलकरांचे, महापालिकेच्या सर्व अधिकाऱ्यांचे, महापौर,विरोधी पक्ष नेते, नगरसेवक या सर्वांचे आभार मानले.

विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे यांनी आपल्याला विरोधी पक्ष नेता म्हणून काम करताना अनेकांचे सहकार्य मिळाले. त्यामुळेच महापालिकेत जनतेचे प्रश्न सोडवताना कोणतीही अडचण आली नाही. यापुढे ही मी जनतेची सेवा करणे, हेच उद्दिष्ट ठेवून,जमिनीवर पाय ठेवून काम करत राहणार आहे असे सांगून आपल्याला निवडून दिलेल्या मतदार बंधू भगिनीनां त्यांनी मनापासून धन्यवाद दिले

आयुक्त गणेश देशमुख यांनी आजवर काम करताना सदस्यांचे आलेले अनुभव सांगितले.नगरपालिकेची महापालिका झाल्यामुळे झालेले फायदे त्यांनी सांगितले. कोराना काळात आलेले अनुभव सांगून सर्व सदस्यांना समान न्याय दिल्याचे सांगितले. भविष्यात महापालिकेने विकासाचे टार्गेट ठेवून काम केले पाहिजे असे सांगितले.

## जुन्या मुंबई पुणे महामार्गावर खड्ड्यात आदळून रिक्षा चाक तुटले

मिळाल्याने रिक्षा एका पाण्याने भरलेल्या खड्ड्यात जोरदार आदल्याने रिक्षाचे पुढचे चाक एक्सेल सहित तुटून झाडीत अडकले व रिक्षा रस्त्याचे मधो मध उभी राहिल्याने सौदेवाने रिक्षा चाक बाळ बाळ बचावला.

ह्या मार्गावरून अखिल भारत जनरली फेडरेशनचे काही पदाधिकारी व प्रवासी वाहन चालक जात असताना रिक्षाचे एक्ससेल तुटलेले पाहून रिक्षा चालकाच्या मदती साठी धाव घेतली व रिक्षा रस्त्यावरून उचलून रस्तेच्या साईट पट्टीवर ठेवली.

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ चे रुंदीकरणाचे काम गेल्या वर्षी पूर्ण झाले होते. पावसाळा सुरवात होताच या माहामार्गा वर खालापूर फाटा ते शिळफाटा पर्यंत खड्ड्याचे साम्राज्य पसरले खड्ड्यात रस्ता की रस्त्यात खड्डा आहे हे समजून येत नसल्याचे चित्र दिसून येत आहे. ह्या रस्त्यावर प्रवास करताना प्रवासी वाहन चालकांना ताडेवरची कसरत करावी लागत आहे. खड्ड्यात अदळून रिक्षाची ही अवस्था झाली तर दुचाकी आदल्यास किती मोठे अपघात होईल? नागरिकांचे जीव गेल्यावर रस्त्यांच्या कामाला दर्जा मिळणार का? असा संताप सवाल प्रवासी वाहन चालकांसह नागरिकांमधून होत आहे.

**अर्जदाराचे वकील**
**ॲड.प्रवीण बा. म्हात्रे**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात
फौ.चौ.अर्ज क्र.७२७/२०२२
नि.नं.७/ड

१) श्रीमती.स्वाती सुनील उर्फ बाळाराम देशमुख
वय : ४२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.कोपर, पो.गव्हाण,
ता.पनवेल, जि.रायगड, पिन–४१०२०६ — अर्जदार

विरुद्ध

ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत गव्हाण
पत्ता : ग्रामपंचायत कार्यालय
मु.पो.गव्हाण, ता.पनवेल,
जि.रायगड, पिन–४१०२०६ — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै.सुनील रामचंद्र देशमुख उर्फ बाळाराम रामचंद्र देशमुख यांचा मृत्यू दि.२३/१०/२०१४ रोजी मु.कोपर, पो.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला आहे. परतु कै.सुनील रामचंद्र देशमुख उर्फ बाळाराम रामचंद्र देशमुख यांच्या मृत्यूची नोंद ग्रुप ग्रामपंचायत गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू नोंदणी पुस्तिकेत केलेली नाही. तरी ती करून मिळावी याकरिता अर्जदार यांनी 'उशिरा मृत्यूनोंदी' चा आदेश मिळावा यासाठी पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

सबब, सदरचा उशिरा मृत्यूनोंदीचा दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात लेखी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस मृत्यूदाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख ८/०७/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक फौ.न्याया, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल

### संमतीपत्र

**मी खाली सही करणार श्री.अल्ताफ अहमद शेख, रा.मुंब्रा, ठाणे, कारणे संमती देतो की, माझी स्वतःची मौजे : माणगाव तर्फे वरेडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील सर्वे क्र.९३, सर्वे क्र.८२, सर्वे क्र.८६ व सर्वे क्र.८७ या शेतजमीन मिळकतींचे स्वामित्व व टायटल तपास करण्याकरिता वर नमूद केलेल्या माझ्या मालकीच्या असणाऱ्या शेतजमीन मिळकतींची तपासणीबाबत स्थानिक वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याबाबत मी हे संमतीपत्र आज रोजी दि.०८/०६/२०२२ रोजी लिहून देत आहे.**

**पनवेल**
**दि.०८/०६/२०२२**

**सही/–**
**अल्ताफ अहमद शेख**
**संमती देणार**

### जाहीर नोटीस

माझ्या अशिलांच्या वतीने तमाम जनतेस या नोटीशीद्वारे असे सुचित करण्यात येते की, माझे अशिल यांनी श्री.जितेश नारायण कोळी (कै.निर्मला त्रिंबक कडके उर्फ निर्मला नारायण कोळी (मयत) याचे वारस) यांच्या मालकीचा साडेबारा टक्के योजनेंतर्गत भूखंड क्र.९/२७, सेक्टर २०, क्षेत्र ४०.०४ चौ.मी. रोडपाली (कळंबोली), ता.पनवेल, जि.रायगड येथील भूखंडाचे सर्व हक्क, अधिकार व फायदा कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

कोणाही व्यक्ती, व्यक्तीचे किंवा आर्थिक संस्थांचे भूखंड संदर्भात कुठल्याही प्रकारचे दावा, हरकती जसे विक्री, गहाण, ताबा, जबाबदारी, बक्षिस, भेट, भाडेपट्टा, वारसाहक्क, लीन किंवा इतर जर असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत दावेशी संबंधित असलेल्या दस्तऐवजांची प्रमाणित केलेल्या प्रतीसह खालील सही केले यांच्या कार्यालयीन पत्यावर संपर्क साधवा. अन्यथा विक्री व हस्तांतरणाचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर कुठल्याही प्रकारच्या येणाऱ्या हरकती, तक्रारींचा विचार करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**संपादीत केलेल्या भूखंडाचा तपशिल**

| नोड | फाईल नं. | भूखंड क्रं. | सेक्टर | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| रोडपाली (कळंबोली) | १७१ | ९/२७ | २० | ४०.०४ चौ.मी. |

दि.०८/०७/२०२२

**सही/–**
**ॲड.अतुलकुमार भ. देशकर**
**मुंबई उच्च न्यायालय**
**यशोकिरण हौ.सोसायटी,**
**ए–१३, लोखंडीपाडा, सावरकर चौक, पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९८६९३३०४१८**

### जाहीर नोटीस

माझ्या अशिलांच्या वतीने तमाम जनतेस या नोटीशीद्वारे असे सुचित करण्यात येते की, माझे अशिल यांनी श्रीमती.सुनिता राजू कोळी उर्फ सुनिता त्रिंबक कडके यांच्या मालकीचा साडेबारा टक्के योजनेंतर्गत भूखंड क्र.९/१८, सेक्टर २०, क्षेत्र ४०.०४ चौ.मी. रोडपाली (कळंबोली), ता.पनवेल, जि.रायगड येथील भूखंडाचे सर्व हक्क, अधिकार व फायदा कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

कोणाही व्यक्ती, व्यक्तीचे किंवा आर्थिक संस्थांचे भूखंड संदर्भात कुठल्याही प्रकारचे दावा, हरकती जसे विक्री, गहाण, ताबा, जबाबदारी, बक्षिस, भेट, भाडेपट्टा, वारसाहक्क, लीन किंवा इतर जर असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत दावेशी संबंधित असलेल्या दस्तऐवजांची प्रमाणित केलेल्या प्रतीसह खालील सही केले यांच्या कार्यालयीन पत्यावर संपर्क साधवा. अन्यथा विक्री व हस्तांतरणाचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर कुठल्याही प्रकारच्या येणाऱ्या हरकती, तक्रारींचा विचार करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**संपादीत केलेल्या भूखंडाचा तपशिल**

| नोड | फाईल नं. | भूखंड क्रं. | सेक्टर | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| रोडपाली (कळंबोली) | १७१ | ९/१८ | २० | ४०.०४ चौ.मी. |

दि.०८/०७/२०२२

**सही/–**
**ॲड.अतुलकुमार भ. देशकर**
**मुंबई उच्च न्यायालय**
**यशोकिरण हौ.सोसायटी,**
**ए–१३, लोखंडीपाडा, सावरकर चौक, पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९८६९३३०४१८**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## वृक्षांची पूजा करून करण्यात आले वृक्षारोपण



**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

सामाजिक वनीकरण रायगड विभाग वन परिक्षेत्रपाल रोहा व नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संस्थेच्या श्रमिक विद्यालय चिल्हे येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला.

स्व.वसंतराव नाईक हरित महाराष्ट्र अभियान अंतर्गत सामाजिक वनीकरण रायगड विभाग वन परिक्षेत्रपाल रोहा व विद्यालयातील हरित सेना यांच्या वतीने वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांकडून वृक्षारोपण करण्यासाठी आणलेल्या रोपांचे पूजन करून व त्यांच्याप्रती क्रुतज्ञता भाव व्यक्त करून विविध प्रजातींच्या वृक्षांच्या रोपांची लागवड करण्यात आली. विद्यालयाचे मुख्याध्यापक दिपक जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमप्रसंगी

येथील सरपंच मानसी लोखंडे, रोहा वनक्षेत्रपाल एस.डी.पाटील, रोहे वनपाल दिलिप वाघे, कोलाड वनपाल महादेव कराडे, वनरक्षक रोहा गिरिष थळकर, वनमजूर सुनील वांगी, वनमजूर सुरेश वाघमारे,सामाजिक कार्यकर्त्या गुलाब वाघमारे आदींसह येथील शिक्षक नरेंद्र माळी, आर.के.म्हात्रे, शिवनाथ दराडे, अमोगसिद्ध सुरवसे, संजय आंधळे, अमित डाके, पांडुरंग शिद, अनुराधा मोरे, ज्योत्सना सबरदंडे उपस्थित होते.

पर्यावरणाचा होत असलेला -हास घातक ठरत असल्याने व्रुक्षारोपण करणे काळाची गरज आहे. तर विपुल वनसंपदा असलेला जिल्हा ही आपल्या जिल्ह्याची शान असून ती आपण जपली पाहिजे अशाप्रकारचे मार्गदर्शन रोहा वनक्षेत्रपाल एस.डी.पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले.

# राज्य वस्तू व सेवा कर विभागातील सहआयुक्तची ७० लाखांची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

साठ लाख रुपयांमध्ये रो हाऊस देतो असे सांगून रो हाऊस बँकेत गहाण ठेवला व हेवी डिपॉझिट करता १० लाख रुपये घेऊन राज्य वस्तू व सेवा कर विभागातील सहआयुक्त रमेश भागूजी जैद (वय ५८) यांची ७० लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी जयराम राय यांच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रमेश जैद हे खारघर, सेक्टर ५ येथे राहत असून ते जागेच्या शोधात असताना त्यांची ओळख खारघर परिसरात राहणाऱ्या जयराम भागीरथी राय यांच्यासोबत झाली. ते व्यवसायाने बिल्डर आहेत. यावेळी त्यांनी सेक्टर १२, प्लॉट नंबर इ९७, खारघर येथील घर दाखवले. यावेळी या रो हाऊस करता एक कोटी वीस लाख एवढ्या रकमेची मागणी केली. त्यांच्यात एक करार झाला. यावेळी रो हाऊसचे इंटरियर करण्याकरता जैद यांनी जयराम यांच्यासोबत रो हाऊसचा तळमजला पाच वर्षांकरिता दहा लाखाच्या हेवी डिपॉझिटवर भाडे करार करून मार्च २०२२ मध्ये घेतला. त्यानंतर जयराम यांनी बिल्डर व्यवसायामध्ये तोटा झाला असून त्यांच्यावर बँकेचे कर्ज असल्याने हे कर्ज फेडण्याकरता ६० लाखाची गरज असल्याचे सांगून रो हाऊसचा ६० लाख रुपयात व्यवहार करण्यास तयारी दर्शवली. त्यानुसार खरेदीची रक्कम ६० लाख व स्टॅम्प ड्युटी आणि रजिस्ट्रेशनचे तीन लाख ९० हजार ८०० अशी एकूण ६३ लाख ९० हजार आठशे रुपये रक्कम स्वतःकडे जमा केली. व २६ मार्च रोजी पनवेल रजिस्टर कार्यालयात जाऊन रो हाऊसचे पार्ट पेमेंट डीड केली. त्यानुसार ६० लाख रुपयांना सदरचा फ्लॅट घेण्याचे ठरले. हे साठ लाख रुपये जयराम यांच्या खात्यावर जमा करण्यात आले. तसेच हेवी डिपॉझिट करता दहा लाख रुपये देखील जमा केले.

त्यानंतर जयराम राय यांनी सदरचा रो हाऊस जीपी पारसिक बँक, कळंबोली येथे गहाण ठेवून त्यावर एक कोटी ८७ लाख एवढ्या रकमेचे कर्ज घेतल्याची जैद यांना माहिती मिळाली. यावेळी बँकेत जाऊन खात्री केली असता रो हाऊस बँकेमध्ये गहाण ठेवल्याचे सांगितले व अधिकची खात्री केली असता रो हाऊसचे पूर्ण कर्ज जोपर्यंत भरले जात नाही तोपर्यंत रो हाऊसची कागदपत्र प्राप्त होणार नसल्याचे बँकेतून सांगण्यात आले. यावेळी जयराम राय यांच्याकडे जाऊन कर्जफेड करून कागदपत्रे द्या असे सांगितले असता त्याने नकार दिला. त्यामुळे ७० लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी जयराम राय यांच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

# पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीतर्फे एच.एम. मेता हायस्कूल विळे परिसरात वृक्षारोपण

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे संवर्धन व वृक्षारोपणाचे महत्त्व कळावे या दृष्टिकोनातून पोस्को कंपनीतर्फे हा उपक्रम राबवण्यात आला. याप्रसंगी पोस्को कंपनीचे अधिकारी तसेच शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक राजेंद्र अमरनाथ ठाकूर, संस्थेचे कार्याध्यक्ष पांडुरंग कोंडू नलावडे, आदी मान्यवर उपस्थित होते.



यावेळी शालेय परिसर आवारात आंबा, पेरू, चिक्कू, लिंबू ,जांभूळ, जाम, आवळा, शेवगा आदी फळ झाडांची लागवड करण्यात आली. पोस्को कंपनीचे अधिकारी, विद्यार्थी, शिक्षक यांनी मिळून वृक्षारोपणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पाडला. शाळेच्या प्रशस्त आवारात वृक्षलागवड करण्यात आली. शाळेच्या मुख्याध्यापकांनी पोस्को कंपनी व्यवस्थापनाचे आभार मानले तसेच वृक्ष संवर्धन करण्याची सर्वस्वी जबाबदारी आम्ही घेऊ असे त्यावेळी सांगितले.

सामाजिक बांधिलकी जपणे हे पोस्कोचे धोरण असून कंपनी व्यवस्थापन नेहमीच विविध सामाजिक उपक्रम राबवण्यासाठी व स्थानिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी सदैव प्रयत्नशील असते. प्रत्येकाने एक तरी झाड मोकळ्या जागेत लावावे जेणेकरून भविष्यात हवामान व्यवस्थित राहील व ऑक्सिजनचा तुटवडा भासणार नाही. असा संदेश यानिमित्ताने देण्यात आला आहे.

# दिघी सागरी पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक

**दै.रायगड नगरी । दिघी**

आषाढी एकादशी व बकरी ईद उत्सवाच्या पार्श्वभूमीवर दिघी पोलिस ठाण्यात शुक्रवारी शांतता समितीची बैठक घेण्यात आली. या बैठकीत पोलीस उपविभागीय अधिकारी प्रशांत स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पो-लीस निरीक्षक संदीप पोमन यांनी शहरातील स्थितीचा आढावा घेत शांतता व सुव्यवस्था राखण्याचे आवाहन केले.



या बैठकीत परिसरातील सरपंच, सदस्य, समाज अध्यक्ष, कमिटी सदस्य तसेच प्रामुख्याने पोलीस पाटील यांनी उपस्थिती दर्शवली. यावेळी आषाढी एकादशी व बकरी ईद हे दोन्ही उत्सव रविवारी एकाच दिवशी साजरे होत आहेत. त्यामुळे हे उत्सव शांतता व सलोख्यात पार पाडण्यासाठी शांतता बैठकीत परिसरातील विविध मान्यवरांशी संवाद साधण्यात आला.

यावेळी ग्रामस्थांना मार्गदर्शन करत सूचनांचे पालन करुन उत्सव साजरे होतील याची दक्षता घ्यावी. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखून गावकऱ्यांनी पोलिसांना सहकार्य करावे. गरज पडल्यास पोलिसांशी संपर्कात राहून पोलिसांची मदत घेणे अशी सूचना उपस्थित नागरिकांना निरीक्षक पोमन यांनी केली. सणांमध्ये कोणत्याही प्रकारची तक्रार आल्यास पोलीस कारवाई केली जाईल. असा इशारा ही दिला. यावेळी दिघी सागरी पोलीस ठाण्यात आयोजित करण्यात आलेल्या शांतता कमिटीच्या बैठकीत उपस्थित ग्रामस्थांनी शहरातील शांतता टिकवून ठेवण्यासाठी सहकार्य करू असे आश्वासन दिले.

# इसम पडला नाल्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल बस स्थानक परिसराच्या बाजूला असलेल्या उघड्या नाल्यात पावसाचे पाणी साचले आहे. येथील नालेसफाई केला जात असल्याचा दावा पालिकेच्या वतीने केला जात आहे. मात्र प्रत्यक्षात या ठिकाणी पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी जागाच नसल्यामुळे चक्क रस्त्याच्या बरोबर पाणी साठले आहे. त्यामुळे बाहेरून येणारे प्रवासी थेट या नाल्यात पडत आहेत. पनवेल बस स्थानक परिसरात येणाऱ्या प्रवाशांना या ठिकाणी रस्ता असल्याचा भास होत असून ते या सांडपाणी वाहून नेणारया नाल्यात पडत आहेत. अनेक तक्रारी येथील रिक्षा संघटने कडून केल्या गेल्या. मात्र पालिकेचे स्वच्छता कर्मचारी येतात थातूर मातूर कामे करतात आणि निघून जातात. मात्र त्यांच्या या थूकपट्टी कामांचा नाहक त्रास पनवेल परिसरासह राज्यातील प्रवाशांना होताना दिसत आहे. काही दिवसांमध्ये या ठिकाणी तब्बल दहा ते बारा जण पडले असल्याच्या घटना घडल्या असल्याचे येथील रिक्षा चालकांनी सांगितले. तसेच एका अडीच वर्षांच्या चिमुकली सह एक दुचाकी देखील या सांडपाण्यामध्ये कोसळली होती. ६ जुलै रोजी अलिबाग येथून वाशीम येथे जाणारे इसम या गटारात पडले. सदरचे पाणी हे रस्ता असल्याचा भास झाल्याने ते या नाल्यात पडले. यावेळी त्यांचा मोबाईल फोन देखील या पाण्यामध्ये गहाळ झाला. या घटनेकडे पनवेल महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे या निमित्ताने समोर आले आहे.

Mujawar sir

Adv.Manjit Kaur

**PUBLIC NOTICE**

IN THE COURT OF CIVIL JUDGE (SENIOR DIVISION) AT PANVEL

MISC APPLICATION NO. 1782 OF 2021

Exh : 8/D

N.D.25/08/2022

KIRAN DHANAJI BHOSALE
NANDA DHANAJI BHOSALE
CHARUDATTA DHANAJI BHOSALE
All residing at Flat No.002 I wing
satyakunj complex, Plot No.41/42
Sector-36, Kamothe 410209 Applicants
V/s
Nil Opponent

Let it be known to all concerned that deceased late DHANAJI SHRIRANG BHOSALE therefore the applicants have filed the Misc application no.1782/21 application for heirship certificate under the provision of Bombay regulation act VIII of 1827

**SCHEDULE OF IMMOVABLE PROPERTY**
**100% Share in flat no 002 I wing satyakunj complex, Plot no.41/42 sector 36, Kamothe 410209**

If any person/s have any objection title, claim share, or any kind of interest in the said property which is more particularly described in the schedule hereinabove is hereby invited. Then they may appear in person or through their advocate, objecting this application in the court of civil judge S.D. at Panvel, Dist Raigad, Maharashtra. If no appears and objects for the same within 30 days from the date of publiction of this notice then this Hon'ble court will proceed to pass the necessary order thereon which please note.

Date : 08/07/2022

| Sd/- Jr.Clerk C.C.S.D.Panvel | Court Seal | Sd/- Asst.Superident. C.C.S.D.Panvel |
|---|---|---|

# वाढीव नळपाणी पुरवठा योजनेसाठी आ.अनिकेत तटकरे यांच्याकडून प्रशासकीय मंजुरीचे पत्र

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील तळवली तर्फे अष्टमी गावातील नागरिकांच्या वाढीव नळपाणी पुरवठा योजनेसाठी आ.अनिकेत तटकरे यांच्याकडून ५९ लाख ७३ हजार ७५० रू.एवढ्या निधीचे प्रशासकीय मान्यतेचे पत्र ग्रामस्थांना देण्यात आले आहे.

यावेळी माजी सरपंच वसंत मरवडे, राम मरवडे, गोवे माजी सरपंच नरेंद्र जाधव, माजी उपसरपंच गजानन बामणे, रविंद्र मरवडे, नामदेव मरवडे आदींसह अन्य कार्यकर्ते उपस्थित होते. तर कोकणचे भाग्यविधाते तथा रायगडचे खा.सुनील तटकरे, आ.आदिती तटकरे व युवकांचे प्रेरणास्थान आ.अनिकेत तटकरे यांच्या माध्यमातून सदरचे प्रशासकीय मान्यतेचे पत्र खा.सुनील तटकरे यांच्या सुतारवाडी येथील गीताबाग नर्सरी निवासस्थानी संपन्न झालेल्या एका छोटेखानी कार्यक्रमात देण्यात आले आहे.

तळवली तर्फे अष्टमी या गावाचा दिवसेंदिवस होत असलेला विस्तार पाहता सद्यस्थितीत चालू असलेला पाणीपुरवठा कमी पडत असल्याची व त्यासाठी नवीन वाढीव नळ पाणी पुरवठ्याची मागणी ग्रामस्थांनी केली असता त्याची त्वरित दखल घेऊन व त्यासाठी ५९ लाख ७३ हजार ७५० रुपये एवढा निधी मंजूर केला असून त्याचा प्रशासकीय मान्यतेचे पत्र आ.अनिकेत तटकरे यांच्या हस्ते ग्रामस्थांना देण्यात आले आहे. तसेच गावातील गावठाण अंतर्गत रस्त्यांची झालेली दुरावस्था पाहता त्याची सुद्धा मागणी आ. अनिकेत तटकरे यांच्याकडे केली असता त्याची सुद्धा तातडीने दखल घेऊन गावठाणातील अंतर्गत रस्त्या करिता पाच लाख मंजूर करण्यात आले आहेत.गरजेच्या वेळी खा.सुनील तटकरे व आ.आदिती तटकरे, आ.अनिकेत तटकरे यांनी मोलाचे सहकार्य केले असता ग्रामस्थांनी त्यांना धन्यवाद दिले आहेत.



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही १) फेन्सीबेन ग्यानचंदजी जैन उर्फ शिंगी, २) श्री.प्रमोद ग्यानचंदजी जैन उर्फ शिंगी यांच्या संमतीने आमचे अशिलांना हस्तांतर करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असून ती सदर हस्तांतर करण्याचा संपूर्ण हक्क व अधिकार असल्याची खात्री, हमी व भरवसा त्यांनी आमचे अशिलांना दिला आहे.

सबब सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार व हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत आमचे खालील पत्यावर मुळ कागदोपत्री पुराव्यानिशी भेटून व कागदपत्रे दाखवून आमची खात्री पटवून द्यावी व स्वतःची लेखी हरकत आमचेकडे नोंदवावी अन्यथा सदर मिळकत निर्वेध व निजोखमी समजून सदर मिळकतीचा हस्तांतराचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील व नंतर कोणाचीही कसलीही तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. सबब ही जाहीर नोटीस दिली असे.

परिशिष्ट

तुकडी व जिल्हा : रायगड, पोटतुकडी व तालुका रोहा व तसेच जिल्हा परिषदेच्या आणि पंचायत समिती, व ग्रामपंचायत वाशी यांचे हद्दीतील आणि मे.दुय्यम निबंधक, रोहा यांचे अधिकार क्षेत्रातील मौजे : वाशी, ता.रोहा, जि.रायगड येथील रेव्हेन्यू रेकॉर्डनुसार शेत मिळकत आहे त्यांचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : वाशी, ता.रोहा, जि.रायगड**

| परिशिष्ट क्र. | भूमापन क्र. व उपविभाग | भोगवाट दार वर्ग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. लागवड योग्य क्षेत्र | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| अ | ७६ (जुना सर्व्हे नं.७८) | १ | जिरायत ०-७४-८० एकूण लागवड अयोग्य क्षेत्र (पोट खराबा) ०-३०-० | १.३१ |
| | एकूण क्षेत्र १-०५-७० हे.आर.चौ.मी. | | | |

येणेप्रमाणे जमीन मिळकत असे व तिचेशी अॅटॅच्ड हक्क, अधिकार व हितसंबंधासहीत दरोबस्त. कळावे. ही जाहीर नोटीस दिली असे.

दिनांक : ०८/०७/२०२२
ठिकाण : पनवेल

**सही/-**
**अॅड.श्री.एस.व्ही.क्षिरसागर**
**डी-६०७२, डी विंग, ६ वा मजला, बिमा कॉम्प्लेक्स, स्टील मार्केट, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२१८**
**मो.नं.९६९९८०२८०२**

मा.गोडसे सो

**अर्जदारातर्फे वकील**
**अॅड.हर्षदा सुनील गडकर**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.५८१/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१०/०८/२०२२

१) श्रीमती.भारती कुमार खानोलकर
वय वर्षे : ६२, धंदा : गृहिणी
२) इला कुमार खानोलकर
वय वर्षे : ३६, धंदा : नोकरी
दोघेही रा.अं.भु.क्र.६१/६, 'दत्तगिरी' बंगला,
जुना ठाणा रोड, एच.ओ.सी.कॉलनीजवळ,
पनवेल, जिल्हा : रायगड अर्जदार

वरील अर्जदार क्र.१ हिचे पती आणि अर्जदार क्र.२ चे वडील कुमार अच्युत खानोलकर यांचे तारीख ०६/०८/२०२० रोजी पनवेल येथे निधन झाले. मयत कुमार अच्युत खानोलकर यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**पनवेल येथील जुना ठाणा रोड, एच.ओ.सी.कॉलनी समोरील अंतिम भूखंड क्रमांक ६१/६, एकूण क्षेत्र ५०१.७० चौ.मी. या निवासी वापराच्या जमीन मिळकतीतील १/३ अविभक्त मालकी हक्क-हिस्सा.**

**आणि**

**पनवेल येथील जुना ठाणा रोड, एच.ओ.सी.कॉलनी समोरील अंतिम भूखंड क्रमांक ६१/६ या मिळकतीवर बांधलेले घर ज्याचे नाव 'दत्तगिरी' बंगला असे आहे, त्यास पनवेल महानगरपालिका कडील 'अॅसेसमेंट रजिस्टर' उताऱ्यावर इमारत क्र. : V11Z2006029 / मालमत्ता क्रं. : 1 असा अनुक्रमांक देण्यात आला आहे.**

वरील स्थावर व घर मिळकतीबाबत अर्जदार यांनी वारसाचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत कागदोपत्री पुराव्यासह या मे.कोर्टात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांच्या विनंतीप्रमाणे वारसाचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०८ माहे ०७ सन २०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

| सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल |
|---|---|---|

# राहत्या घरातून इसम बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राहत्या घरातून कोणास काहीही न सांगता एक इसम कोठेतरी निघून गेल्याने तो हरवल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. मोहम्मदमसूद मुस्लिम खान वय ३० वर्षे, राहणार हरिग्राम गाव, रंग गव्हाळ, केस काळे, चेहरा लांब, उंची ४ फूट ४ इंच, अंगाने सडपातळ, डोळे काळे असून डोक्याच्या मागील बाजूस जुन्या जखमेची खूण आहे तसेच अंगात निळ्या रंगाचा शर्ट व नळी जीन्स पॅन्ट घातलेली आहे.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामासाठी गावठाणामधील संपादीत केलेल्या जमिनीबद्दल व त्यामधील स्थलांतरित होणाऱ्या निवासी वापराच्या बांधकामाबद्दल नुकसान भरपाईपोटी व पुनःस्थापनेसाठी पार्वती किसन मोकल, जितेंद्र किसन मोकल व शारदा बळीराम म्हात्रे सर्व रा.तरघर, ता.पनवेल, जि.रायगड यांचे संयुक्त नावे सिडकोने भूखंड वाटप केलेला होता. त्याचे वर्णन खालीलप्रमाणे :-

| भूखंड वाटपाचे ठिकाण | भूखंड क्रं. | सेक्टर क्रं. | क्षेत्रफळ (चौ.मी.) | निवाडा क्रमांक |
|---|---|---|---|---|
| नोड पुष्पक (वहाळ), ता.पनवेल, जि.रायगड | १३९ | २५ | २३० | TAR-ICIG-37 |

उपरोक्त वर्णन केलेला भूखंड जितेंद्र किसन मोकल, रा.तरघर, ता.पनवेल, जि.रायगड यांनी सदरहू भूखंडाचे संयुक्त मालक त्यांची आई पार्वती किसन मोकल व त्यांची सख्खी बहिण शारदा बळीराम म्हात्रे दोघी रा.तरघर, ता.पनवेल, जि.रायगड या दोघींकडून सदरहू भूखंडामध्ये त्या दोघींचा असलेला कायदेशीर हिस्सा बक्षिसपत्राने हस्तांतरण करून घेतला होता.

तद्नंतर, जितेंद्र किसन मोकल हे मयत झाल्याने त्यांचे पश्चात दिवाणी न्यायालयाकडून जाहीर झालेल्या वारस दाखल्यानुसार उपरोक्त भूखंडामधील जितेंद्र किसन मोकल यांचे वारस म्हणून पत्नी ललिता जितेंद्र मोकल, मुलगा जयदीप जितेंद्र मोकल, मुलगी रुतुजा जितेंद्र मोकल, मुलगा ओमकार जितेंद्र मोकल (अ.पा.क.आई ललिता जितेंद्र मोकल), आई पार्वती किसन मोकल यांचे नावाची नोंद सिडको दप्तरी घेण्यात आली आहे. सदरहू भूखंडामध्ये ललिता जितेंद्र मोकल यांचा १/५ इतका अविभाज्य हिस्सा आहे. तसेच, जयदीप जितेंद्र मोकल यांचा १/५ इतका अविभक्त हिस्सा आहे. तसेच, रुतुजा जितेंद्र मोकल यांचा १/५ इतका अविभक्त हिस्सा आहे. तसेच, ओमकार जितेंद्र मोकल (अ.पा.क.आई ललिता जितेंद्र मोकल) यांचा १/५ इतका अविभक्त हिस्सा आहे आणि पार्वती किसन मोकल यांचा १/५ इतका अविभक्त हिस्सा आहे.

म्हणून आता उपरोक्त वर्णन केलेला भूखंड माझे अशिल जयदीप जितेंद्र मोकल, ओमकार जितेंद्र मोकल (अ.पा.क.आई ललिता जितेंद्र मोकल) दोघे रा.तरघर, ता.पनवेल, जि.रायगड हे त्यांची आई ललिता जितेंद्र मोकल, त्यांची आजी पार्वती किसन मोकल व त्यांची सख्खी बहिण रुतुजा जितेंद्र मोकल रा.तरघर, ता.पनवेल, जि.रायगड यांचेकडून सदरहू भूखंडामध्ये त्या तिघींचा असलेला ३/५ इतका अविभक्त हिस्सा बक्षिसपत्राने हस्तांतरण करून घेण्याच्या विचारात आहे.

तरी सदर भूखंडाचे बाबतीत अथवा त्याच्या कोणत्याही हिश्श्याचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीन, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा, कोणत्याही प्रकारची बुकींग वगैरे कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी हरकती प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे बक्षिसपत्राने हस्तांतरणाचे व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०९/०७/२०२२
ठिकाण : पनवेल

**सही/-**
**अॅड.जितेंद्र परशुराम म्हात्रे**
**मु.ओवळे, पो.पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**

# संक्षिप्त...

## महाराष्ट्र भूषण परमपूज्य डॉ.नानासाहेब धर्माधिकारी यांच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन



**दै.रायगड नगरी । कर्जत**

महाराष्ट्र भूषण परमपूज्य डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या पुण्यस्मरण निमित्त तीर्थरूप पद्मश्री डॉ. अप्पासाहेब धर्माधिकारी व डॉ. सचीनदादा धर्माधिकारी यांची आज दि.८ जुलै रोजी रेवदंडा येथे त्यांच्या निवासस्थानी कर्जत विधानसभा मतदार संघाचे आमदार महेंद्र थोरवे यांनी भेट घेतली व शुभ आशीर्वाद घेतले, याप्रसंगी महाडचे आमदार भरत गोगावले उपस्थित होते.

## ज्ञानांकूर इंग्लिश मिडियम स्कूल खांब येथे वृक्षारोपण लागवट

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रोहा तालुक्यातील खांब येथील विविध क्षेत्रात नावारूपाला येणारी ज्ञानांकुर इंग्लिश मेडीयम स्कूल खांब येथे गुरुवार दि.७ जुलै २०२२ रोजी वृक्षरोपण लागवटीचे आयोजन करण्यात आले.

ज्ञानांकुर इंग्लिश मेडीयम शाळेच्या मुख्याध्यापिका रिया लोखंडे यांनी विध्यार्थ्यांना वृक्षाचे महत्व पटवून सांगितले वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचारी आहेत या वृक्षामुळे वनाचे संरक्षण होते. दिवसेंदिवस अफाट जंगल तोड झाली परंतु त्याच्या जागी नवीन झाडे लावण्यात आली यामुळे वातावरणात बद्दल घडत असून भविष्य काल कठीण आहे. त्यामुळे प्रत्येकानी एक झाड लावून त्याचे संगोपन करणे गरजेचे आहे. संस्थेचे अध्यक्ष रविंद्र लोखंडे, उपाध्यक्ष सुधीर लोखंडे, सहाय्यक शिक्षिका :-सोनाली शिंदे, ऋतुजा पवार, रुपाली मरवडे, प्रतीक्षा धामणसे, शुभदा भालेकर, आरती लोखंडे, स्नेहा मोहिते,विनायक माहित सर, ओंकार जवरत सर शाळेतील असंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# कोकणातील सर्व जिल्ह्यांना मुसळधार पावसाचा इशारा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

हवामान खात्याकडून राज्यात पुढील ३ दिवस म्हणजे दिनांक ११ जुलै, २०२२ पर्यंत अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. विशेषतः कोकण विभागातील सर्व जिल्ह्यांना मुसळधार ते अति मुसळधार (६४ ते २०० मिमी) पावसाचा इशारा देण्यात आले आहे.

कोंकण विभागात पालघर जिल्ह्यात गेल्या २४ तासात सरासरी ६६ मिमी. पाऊस झाला असून सद्यस्थिती मध्ये जिल्ह्यातील परिस्थिती सामान्य असून जिल्ह्यातील तीन मुख्य नद्या इशारा पा-तळी पेक्षा खाली वाहत आहेत. जिल्ह्यात कोठेही पूरपरिस्थिती नसून खबरदारीचा उपाय म्हणून जिल्ह्यात एनडीआरएफ चे एक पथक तैनात करण्यात आली आहे.

ठाणे जिल्ह्यात गेल्या २४ तासात सरासरी ७६.४ मिमी. पाऊस झाला आहे. जिल्ह्यात कुठेही पूर परिस्थिती नाही तसेच सर्व नद्या इशारा पातळीच्या खाली वाहत आहेत. जिल्ह्यात सर्व प्रकारची वाहतूक सुरुळीत सुरु आहे. खबरदारीचा उपाय म्हणून जिल्ह्यात एनडीआरएफ च्या दोन टीम तैनात करण्यात आल्या आहेत.

मुंबई गेल्या २४ तासात कुलाबा येथे ५२.८ मिमी तर सांताक्रूझ येथे ४९.८ मिमी पावसाची नोंद झाली आहे. मात्र अद्याप सर्व प्रकारची वाहतूक सुरळीत असल्याबाबत बीएमसी नियंत्रण कक्षाने कळविले आहे. मध्य रेल्वे व पश्चिम रेल्वे मार्गावरील वाहतूक सुरळीत सुरु आहे. मुंबई मध्ये एनडीआरएफ च्या एकूण ५ टीम तैनात करण्यात आल्या आहेत.

रायगड जिल्ह्यात गेल्या २४ तासात सरासरी ७७.९ मिमी. पाऊस झाला आहे जिल्ह्यात कुठेही पूर परिस्थिती नाही तसेच कुंडलिका नदी इशारा पातळीवर वाहत आहेत. आतापर्यंत जिल्ह्यातील दरड प्रवण व पूर प्रवण भागातील १९६८ कुटुंब म्हणजे एकूण ३६४९ व्यक्तींना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात आले आहे. आता पर्यंत जिल्ह्यात ११ घरांचे अंशतः नुकसान झाले आहे तसेच ५ घरांचे पूर्णतः नुकसान झाले आहे. खबरदारीचा उपाय म्हणून जिल्ह्यात एनडीआरएफ टीम तैनात करण्यात आल्या आहेत.



रत्नागिरी जिल्ह्यात गेल्या २४ तासात ७१.५ मिमी एवढ्या पावसाची नोंद झाली असून सद्यस्थितीत पूर परिस्थिती नाही मात्र जिल्ह्यातील खेड येथील जगबुडी नदी व राजापूर तालुक्यातील कोदवली नदी इशारा पातळी वरून वाहत आहेत. सदर भागातील नागरिकांचे आवश्यकतेनुसार स्थलांतर करण्यात येत असून नदी काठावरील नागरिकांना सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या असून जिल्हा प्रशासन सतर्क आहे. तसेच वारंवार दरड कोसळण्याच्या घटना घडत असल्याने सुरक्षेच्या कारणास्तव मुंबई गोवा महामार्गावरील परशुराम घाट सर्व प्रकारच्या वाहतुकीकरिता दि. ०९ जुलै २०२२ रोजी पर्यंत बंद करण्यात आला आहे व वाहतूक अन्य पर्यायी मार्गाने वळवण्यात आली आहे. दरड प्रवण व पूर प्रवण भागातील २८८ कुटुंब म्हणजे एकूण ९६५ व्यक्तींना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात आले आहे. आता पर्यंत जिल्ह्यात १२० घरांचे अंशतः नुकसान झाले आहे तसेच ६ घरांचे पूर्णतः नुकसान झाले आहे. खबरदारीचा उपाय म्हणून जिल्ह्यात दोन एनडीआरएफ च्या टीम तैनात करण्यात आल्या आहेत.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात गेल्या २४ तासात १२७.० मिमी एवढ्या पावसाची नोंद झाली असून कुठेही पूर परिस्थिती नाही तसेच सर्व नद्या इशारा पातळीच्या खाली वाहत आहेत. मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक सुरुळीत सुरु आहे. खबरदारीचा उपाय म्हणून जिल्ह्यात एक एनडीआरएफ ची टीम तैनात करण्यात आली आहेत, पुणे विभागात पुणे, सातारा, सांगली या जिल्ह्यातील परिस्थिती सामान्य असून जिल्ह्यात कुठेही पूर परिस्थिती नाही तसेच सर्व नद्या इशारा पातळीच्या खाली वाहत असून सर्व प्रकारची वाहतूक सुरुळीत सुरु आहे.

कोल्हापूर जिल्ह्यात गेल्या २४ तासात सरासरी १९ मिमी. पाऊस झाला असून, सद्यस्थिती मध्ये पूर परिस्थिती नाही.पंचगंगा नदीची सध्याची पाणी पातळी ३९.६ फुट असून इशारा पातळी ३९ फुट एवढी आहे. पुढील ४ दिवस मुसळधार पावसाचा इशारा लक्षात घेता एनडीआरएफ च्या दोन तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत.

राज्यात अनेक ठिकाणी मध्यम ते मुसळधार पाऊस सुरु असून मंत्रालय नियंत्रण कक्ष राज्यातील सर्व जिल्हा नियंत्रण कक्षांच्या सातत्याने संपर्कात आहे. पूर परिस्थिती बाबत उपाय योजना म्हणून प्रशासनातर्फे एनडीआरएफ व एसडीआरएफ च्या तुकड्या पूर प्रवण जिल्ह्यांमध्ये या आधीच तैनात केल्या आहेत.

राज्यातील पूर परिस्थिती बाबत उपाय योजना म्हणून प्रशासनातर्फे राष्ट्रीय व राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या तुकड्या पूर प्रवण जिल्ह्यांमध्ये या आधीच १५ तुकड्या तैनात केल्या आहेत.

मुंबई (कांजूरमार्ग १ घाटकोपर १) -२, पालघर -१, रायगड - महाड- २, ठाणे-२, रत्नागिरी-चिपळूण -२,कोल्हापूर-२, सा-तारा-१, सिंधुदुर्ग-१ राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या (एनडीआरएफ) एकूण १३ टीम तैनात आहेत. तर नांदेड-१, गडचिरोली -१ अशा एकूण दोन राज्य आपत्ती प्रतिसाद दल (एसडीआरएफ) च्या तुकड्या तैनात केलेल्या आहेत.

मुंबई -३,पुणे-१, नागपूर-१ अशा एकूण ५ राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ), तसेच धुळे-२,नागपूर-२ अशा एकूण ४ टीम राज्य आपत्ती प्रतिसाद दल (एसडीआरएफ) च्या कायमस्वरूपी तुकड्या आहेत. राज्य आपत्ती मंत्रालय नियंत्रण कक्षाकडून आज सकाळी ११ वाजेपर्यंत प्राप्त माहितीनुसार हा अहवाल प्रसिध्दीसाठी देण्यात येत आहे.

## ग्रामीण भागातील जनता पुन्हा प्रकाशमय होणार आ.भरत गोगावले यांच्या प्रयत्नांना यश

**दै.रायगड नगरी । महाड**

जिल्ह्यातील स्ट्रीट लाईट पूर्ववत चालू करण्यासंदर्भात आज दि ८रोजी रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या जिल्हा परिषदेतील दालनात आमदार भरतशेठ गोगावले यांनी बैठक घेतली.

या बैठकीदरम्यान कार्यकारी अधिकारी यांच्या निदर्शनास गोगावले यांनी गेल्या पावसाळ्यातील दुर्घटना बद्दलची आठवण करून देत या वर्षी देखील पावसाचे प्रमाण हवामान खात्याच्या अंदाजानुसार भरपूर असल्याकारणाने सदर स्ट्रीट लाईटची अत्यंत आवश्यकता आहे असे गोगावले यांनी सांगितले गोगावले यांच्या मागणीची दखल घेत ग्रामीण भागातील आणि शहरी भागातील बंद पडलेल्या स्ट्रीट लाईट पूर्ववत सुरू करण्याचा आदेश संबंधित इलेक्ट्रिक विभागाचे अधीक्षक अभियंता मुलानी यांना सुचित केले. यावेळी कार्यकारी जिल्हाधिकारी यांनी मुलानी साहेब यांना आपली जी थकीत रक्कम आहे ती आम्ही दोन दिवसात अदा करत आहोत तत्पूर्वी तात्काळ बंद केलेली लाईट सुरू करण्याचे आदेश देण्यात यावेत असे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले. यावेळी उपस्थित जिल्हा परिषद सदस्य मनोज काळीजकर माजी जिल्हा परिषद सदस्य निलेश ताठरे उपस्थित होते.



## कळंबोली सर्कसह एस.टी स्टॅन्ड परिसरात फिरणाऱ्या अल्पवयीन मुलांवर कारवाईची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली सर्कसह एस.टी स्टॅन्ड परिसरात फिरणाऱ्या अल्पवयीन मुलांवर कारवाईची मागणी परिसरातील रहिवासी व वाहनचालक करीत आहेत.

कळंबोली सर्कल येथे सिग्नल ला गाडी थांबताच वेगवेगळ्या वस्तू विकण्यासाठी किंवा पावसाळ्यामध्ये गाड्यांच्या काचा पुसण्यासाठी तर काही वेळा भीक मागण्यासाठी अल्पवयीन मुले टोळ्याने फिरत असतात. भर पावसात हि मुले अच-ानक वाहनांच्या पुढे आल्याने अपघात सुद्धा घडत असतात. अशीच अवस्था नवीन पनवेल येथील सिग्नल व पनवेल बस स्थानक परिसरात आहे.

तरी अस्या मुलांना ताब्यात घेऊन त्यांना योग्य मार्गी लावणे घरजेचे बनले आहे. यासाठी संबंधित विभागाने कारवाई करावी अशी मागणी रहिवासी व वाहनचालक यांच्याकडून होत आहे.

# रायगडसह पनवेलमध्ये मिशन झिरो ड्रॉप आऊट मोहीम शाळाबाहय मुलांचे सर्वेक्षण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोना काळात वेगवेगळया क्षेत्रांना फटका बसला असताना शिक्षण क्षेत्रही त्यास अपवाद ठरले नाही. बेरोजगारी, उपासमार यासह आर्थिक दुष्टचक्रात अडकलेल्या नागरिकांनी स्थलांतराचा पर्याय स्वीकारला. याचा फटका शैक्षणिक क्षेत्राला बसला. मागील दोन वर्षात शाळाबाहय विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढले आहे, अशा बालकांचा शोध घेत त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण विभागाने कंबर कसली असून विजय तळेकर, तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली शाळाबाहय मुले शोध मोहिम राबविण्यात आली होती. या मोहिमेमध्ये २४६ शाळाबाहय बालकांचा शोध घेऊन त्यांना दाखल करून घेण्यात आले आहेत.

मिशन झिरो ड्रॉप आऊट मोहिम राबविण्यात येणार आहे. ५ ते २० जुलै, २०२२ या कालावधीत पनवेल तालुक्यात या संदर्भात सर्वेक्षण करण्यात येणार आहे. याबाबत योग्य ते नियोजन करण्यासाठी ४ जुलै रोजी तालुकास्तरीय शाळाबाहय समितीची, विजय तळेकर, तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेण्यात आली. त्यामध्ये शासन निर्णय २३ जुन परिपत्रकाचे वाचन करण्यात आले.

तसेच तालुक्यात एकही मुल शाळाबाहय राहणार नाही याची खबरदारी घेण्याच्या सुचना करण्यात आल्या आणि नियोजन करण्यात आले. तालुक्यातील प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची या सर्वेसाठी प्रगणक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. या सभेमध्ये महेश खामकर, गटशिक्षणाधिकारी, पं.स. पनवेल, सुनिता राठोड, अधिव्याख्यता, डायट पनवेल सिताराम रामा मोहिते, वरिष्ठ विस्तार अधिकारी, पं.स. पनवेल, वनिता तांडेल, पर्यवेक्षिका, एकात्मिक बाल विकास प्रकल्प, पं. स. पनवेल व सर्व विषय साधनव्यक्ती उपस्थित होते.

तालुक्यातील संपूर्ण भागात ३ ते ६ वयोगटातील सर्वेक्षण करण्यासाठी महिला बाल विकास प्रकल्प यांच्या अधिकारी, अंगणवाडी सेविका, मदतनीस तसेच ६ ते १८ वयोगटातील सर्वेक्षण करण्यासाठी गटशिक्षणाधिकारी महेश खामकर, वरिष्ठ विस्तार अधिकारी सिताराम मोहिते, विषयसाधनव्यक्ती, पर्यवेक्षक म्हणून केंद्रप्रमुख त्या-त्या शाळेचे मुख्याध्यापक काम पाहणार आहेत. या सर्वेक्षणासाठी वेगवेगळया विभागाची मदत घेतली जाणार आहे. घरोघरी, बसस्थानक, सार्वजनिक ठिकाणे, बाजार, विटभट्टया आदि ठिकाणी शाळाबाहय मुलांचा शोध घेत त्यांना शाळेत प्रवेशित करण्यात येणार आहे. तसेच अध्यक्ष तहसीलदार विजय तळेकर, सहअध्यक्ष गटविकास अधिकारी सुनिल भोये, सचिव म्हणून महेश खामकर गटशिक्षणाधिकारी हे काम पाहणार आहेत. या उपक्रमामुळे पनवेल तालुक्यात शिक्षणा-पासून वंचित राहिलेल्या मुलांना चांगलाच फायदा होणार आहे.

तरी सर्व नागरिकांना जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, ग्रामपंचायत सदस्य व स्वयंसेवी संस्थांना जाहीर आवाहन करण्यात येते की, आपल्या नंजीकच्या परिसरात शाळाबाहय मुले आढळल्यास आपण नजीकच्या जिल्हा परिषदेच्या शाळेत अथवा पनवेल पंचायत समितीतील शिक्षण विभागास संपर्क करावा. जेणेकरून कोणतेही मुल शिक्षणाच्या हक्कापासून वंचित राहणार नाही.

# वृक्ष लागवड मोहिमेस सुरुवात



**दै.रायगड नगरी । पनवेल**

जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून महोत्सवा अंतर्गत ५.२५ लक्ष वृक्ष लागवड मोहिमेस ७ जून रोजी धामोळेपाडा तालुका पनवेल येथून सूरूवात करण्यात आली आहे. यावेळी तहसीलदार विजय तलेकर, वन विभागाचे डी. सोनावणे यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

पूर्वजांनी सामाजिक वनीकरणाचा दृष्टिकोन ठेवला होता. यामुळे पर्यावरणाचा समतोल राखला गेला होता. वृक्ष निसर्गचक्र दाखवितात, त्यामुळे वृक्षांची जपणूक झाली पाहिजे. मात्र सध्या पर्यावरणाचा समतोल ढासळत आहे. पर्यावरण रक्षणासाठी जनजागृती महत्त्वाची असून प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावून ते जगवले पाहिजे. जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली मिशन ५.२५ लक्ष वृक्ष वन महोत्सवांतर्गत वृक्षलागवड मोहीम उत्साहात सुरू झाली आहे. तरी, पनवेल तालुक्यातील सर्व नागरिक, स्वयंसेवी संस्था, विद्यार्थ्यांनी या वृक्षलागवड व वृक्षसंवर्धन मोहिमेत सक्रिय सहभागी होवून निसर्गाचा समतोल राखण्यात योगदान द्यावे, असे आवाहन विजय तलेकर यांनी केले आहे.




**ठाणे येथे आयोजित केलेल्या ब्राइडल मेकअप या स्पर्धेमध्ये पनवेल तालुक्यातील स्वाती पाटील हिने प्रथम क्रमांक पटकावुन ''महाराष्ट्रीयन बिगेस्ट कम्पलिशन ऑफ मेकओवर क्वीन ऑफ ठाणे'' हा पुरस्कार पटकावला आहे. सदर स्पर्धेमध्ये संपूर्ण महाराष्ट्रातून मेकअप आर्टीस्ट यांनी सहभाग घेतला होता. या पुरस्काराबद्दल स्वाती पाटील यांचे पनवेल तालुक्यामधून कौतुक करण्यात येत आहे.**

## महाड व पोलादपूरच्या नैसर्गिक आपत्ती निवारणासाठी बचाव साहित्य तातडीने उपलब्ध करुन द्यावे

### आ.प्रविण दरेकर यांचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन

**दै.रायगड नगरी । महाड**

रायगड जिल्ह्यात गेल्या काही दिवसात झालेल्या अतिवृष्टीमुळे महाड व पोलादपूर भागातील परिस्थिती जलमय झाली होती. तेथे जाऊन प्रत्यक्ष तेथील परिस्थितीची आढावा घेतल्यानंतर नैसर्गिक आपत्तीच्या प्रसंगी आवश्यक असलेले शोध व बचाव साहित्य उपलब्ध होण्याची आवश्यकता असून भाजपचे नेते आमदार प्रविण दरेकर यांनी आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांना यांसदर्भात आज निवेदन दिले आहे. तसेच आपत्तीच्या काळात त्या भागांमध्ये संरक्षक भिंती व निवारा केंद्र उपलब्ध करुन देण्याची विनंतीही दरेकर यांनी यावेळी केली. नैसर्गिक आपत्तीसाठी आवश्यक असलेले बचाव साहित्य उपलब्ध करुन देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी आज संबंधित यंत्रणांना दिले.

अतिवृष्टीमुळे महाड व पोलादपूर भागा-तील परिस्थिती जलमय झाली होती. त्यामुळे भाजपचे नेते आमदार दरेकर यांनी दोन दिवसांपूर्वी महाड व पोलादपूर या भागांचा तातडीने दौरा केला. तेथील परिस्थितीचा आढावा घेतला व तेथे तातडीने मदतकार्य देण्याच्यादृष्टीने तेथील जिल्हाधिका-यांना सूचना दिल्या. रायगड मधील महाड व पोल-ादपूर गावांमधील काही भागांमध्ये पूरप्रवण व दरडप्रवण परिस्थिती आहे. पावसाळ्याच्या काळात या भागात वारंवार नैसर्गिक आपत्ती घडत असतात. विशेषत: मान्सून काळात रायगड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी होते. त्यामुळे मान्सून काळात या जिल्ह्याला अनेक आपत्तीच्या प्रसंगांना सामोरे जावे लागते. तथापि, पुरप्रवण, दरडप्रवण गावांमध्ये आपत्कालीन प्रसंगी अत्यंत महत्वाचे व आवश्यक शोध व बचाव साहित्य सहजपणे उपलब्ध असणे गरजेचे आहे. तरी, उद्भवणाऱ्या संभाव्य आपत्तीचा सामना करण्याच्या उद्देशाने आवश्यक शोध व बचाव साहित्याची देण्याची मागणी भाजपचे नेते दरेकर यांनी आज उपमुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात केले आहे.

महाड व पोलादूपर तालुक्याच्या नैसर्गिक आपत्ती निवारणासाठी आवश्यक साहित्याच्या मागणीपत्रकात एचडीपीई बोट, लाईफ जॅकेट्स, लँटर, सॅटेलाईट फोन, हाय बीम सर्च लाईट, मल्टीपरपज फ्लोटिंगस्ट्रेचर, ड्रोन कॅमेरे,जनरेटर्स, वॉकि टॉकी, अंडर वॉटर कॅमेरा, फॉगिंग मशीन्स, बॅटरी ऑपरेटर फ्लड लाईटस आदी प्रमुख साहित्यांचा समावेश आहे. तसेच आपत्तीच्या काळात त्या भागांमध्ये संरक्षक भिंती व निवारा केंद्र उपलब्ध करुन देण्याची विनंतीही आमदार प्रविण दरेकर यांनी याप्रसंगी केली आहे.

